MAH/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# Vidyawarta®

International Multilingual Refereed Research Journal

Issue-26, Vol-02 April to June-2018

Editor
Dr.Bapu G.Gholap

www.vidyawarta.com

MAH/MUL/ 03051/2012 ISSN :2319 9318

आंतरविद्याशाखीय बहुभाषिक संशोधन पत्रिका

# विद्यावार्ता

April To June 2018
Issue-26, Vol-02

Date of Publication
30 April 2018

**Editor**

**Dr. Bapu g. Gholap**

(M.A.Mar.& Pol.Sci.,B.Ed.Ph.D.NET.)

विद्येविना मति गेली, मतीविना नीति गेली
नीतिविना गति गेली, गतिविना वित्त गेले
वित्तविना शूद्र खचले, इतके अनर्थ एका अविद्येने केले

-महात्मा ज्योतीराव फुले

❖ **विद्यावार्ता** या आंतरविद्याशाखीय बहूभाषिक त्रैमासिकात व्यक्त झालेल्या मतांशी मालक, प्रकाशक, मुद्रक, संपादक सहमत असतीलच असे नाही. **न्यायक्षेत्र:बीड**

"Printed by: **Harshwardhan Publication Pvt.Ltd.** Published by **Ghodke Archana Rajendra** & Printed & published at Harshwardhan Publication Pvt.Ltd.,At.Post. Limbaganesh Dist,Beed -431122 (Maharashtra) and Editor **Dr. Gholap Bapu Ganpat.**

Reg.No.U74120 MH2013 PTC 251205

Harshwardhan Publication Pvt.Ltd.
At.Post.Limbaganesh,Tq.Dist.Beed
Pin-431126 (Maharashtra) Cell:07588057695,09850203295
harshwardhanpubli@gmail.com, vidyawarta@gmail.com
All Types Educational & Reference Book Publisher & Distributors / www.vidyawarta.com

https://sites.google.com/site/vidyawartajournal | http://www.vidyawarta.blogspot.com


14) Loneliness in Anita Brookner's Falling Slowly
Dr. Vaibhav H. Waghmare, Solapur || 70

15) सातारा जिल्ह्यातील मुस्लिम समाजाची व्यावसायिक रचना : एक भौगोलिक अभ्यास
आतार जे.एफ., डॉ.डोइफोडे एम.बी., सातारा || 75

16) संत जनाबाई आणि संत बहिणाबाई यांच्या साहित्यातील विविध विचार
औताडे बाळासाहेब [illegible], अहमदनगर. || 77

17) महाभारतातील स्त्री व्यक्तीरेखा-गांधारी
सौ. प्रतिभा प्रभाकरराव देशपांडे , नागपूर. || 80

18) मराठाकालीन स्त्रियांचे कर्तृत्व व दर्जा
प्रा.डॉ.प्रशांत देशमुख , श्रीमती रेखा सिताराम देवकर जळगाव || 82

19) साठोत्तरी काळातील एक अस्तित्ववादी कवी :
वसंत आबाजी डहाके, कु. रूपा घोनमोडे || 86

20) बालक्रीडेच्या अभंगाची पूर्वपीठीका
संत नामदेव. सौ. संगिता जयंत मुळे ,नागपूर. || 89

21) निसर्गाच्या प्रतिबिंबीत करणारी
बालकवींची कविता, प्रा. रमेश या. शिंगणे, गेवराई || 92

22) काळ्या आईवरील कविता
डॉ. पैकेकरी एस. पी.,अहमदनगर || 94

23) उच्च प्राथमिक स्तरावरील पाठ्यक्रमातून आपत्ती व्यवस्थापनासंबंधित घटकांवर पूरक
डॉ. सुषमावती जयवंत पाटील, नाशिक || 98

24) अष्टपैलू व्यक्तिमत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर
प्रा. डॉ. सौ. सुषमा विश्वरत्न तायडे, प्रा. डॉ. के. के. अहिरे,भुसावळ || 102

25) गडचिरोली जिल्ह्याच्या स्थानिक इतिहासातील ऐतिहासिक स्थळे
प्रा.डॉ. नथ्थु सिताराम गिरडे, चंद्रपूर || 105

26) ग्रामीण साहित्य चळवळीचे स्वरूप व प्रभाव
प्रा.डॉ.राजकुमार रघुनाथ मुसणे,गडचिरोली || 108

21

# निसर्गाच्या प्रतिबिंबीत करणारी -बालकवींची कविता

प्रा. रमेश वा. रिंगणे
मराठी विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय,
शिवाजीनगर गढी ता. गेवराई जि. बीड

मराठी काव्यक्षेत्रामध्ये बालकवींच्या कवितांना अनन्यसाधारण महत्त्व आहे. आधुनिक कवितेच्या प्रारंभ काळातच नव्या-नव्या अनुभूतींसह विषयांना वास्तवाच्या जाणिवा प्रकट करता आल्या. यात केशवसुतांच्या कवितेचा आवर्जुन उल्लेख करावा लागतो. पण त्यांचे समकालीन असणारे निसर्ग संवेदनांना चित्रात्मक पध्दतीने रेखाटणारे बालकवी हे ही तितकेच सुरमयी काव्यलेखन करणारे कवी होत. बालकवी (त्र्यंबक बापुजी ठोंबरे) यांची कविता म्हणजे मराठी कवितेतील नव्या प्रवाहाची सुरवात होय. पारंपरिक विषयांना छंद देण्यावरोबरच आपल्या आजुबाजूचे, स्वत:चे अनुभव, सुख-दु:ख व भावानुभव यांना कवितेत स्थान मिळू लागले ते या आधुनिक काळात. निसर्ग तर मराठी कवितेच्या क्षेत्रात स्वतंत्र विषय झाला याचे परिपूर्ण श्रेय हे बालकवींनाच जाते. नव्या जाणिवांना शब्दचमत्कृतीच्या सहाय्याने आणि तितकेच संवेदनशीलपणे व्यक्त केले ते बालकवींनीच. बालकवींच्या कवितेने या माध्यमातूनच मराठी मातीला आणि कवितेला सुध्दा आधुनिक विचारांबरोबरच संवेदनशीलतेचा नवा चेहरा दिला. पुढे हीच कविता मराठी मातीच्या वास्तवाच्या माध्यमातून नाती जोडती झाली. निसर्गाच्या सौंदर्याबरोबरच तरलता, मनमोहकता, आनंद, अद्भुतता घेऊन मराठी कविता अधिकाधिक सृजक झाल्याचे दिसून येते. निसर्गाच्या सौंदर्याची परिपूर्ण अभिव्यक्ती बालकवींच्या कवितेत होताना दिसते. शब्दाअधारे निसर्गाचे एक सुंदर शब्दशिल्प मराठी कवितेत साकारले ते बालकवींच्या प्रतिभेनेच आणि हे शब्दशिल्प गेली शंभर वर्षे अभ्यासक, जाणकार, समीक्षकांना मोहवित, आनंदीत करीत आले आहे. दरवेळी एक वेगळी अनुभूती आणि एक वेगळा प्रत्यय आणून देण्याचं सामर्थ्य बालकवींच्या कवितेत दडलेले आहे. म्हणूनच निसर्ग कवितेच्या प्रवाहाचे अग्रदूत म्हणुन बालकवींचे नाव नोंदवले जाते. (गेले पाहिजे) एकूणच आधुनिक कालखंड हा सौंदर्यवादाने भारावलेला कालखंड होता. वर्डस्वर्थ यांच्या नव्या मांडणीने याची पायाभरणी झाली होती. तिचा प्रचार आणि प्रसार जगभर होत होता. तसाच मराठी कवितेत कवी केशवसुतांच्या कवितेने प्रथमत: उद्‌गार केला आणि निसर्गाच्या बाबतीत प्रवाहीत केला तो बालकवींनीच.

**हिरवे हिरवे गार गालिचे**
**हरित तृणाच्या मखमालीचे**
**त्या सुंदर मखमालीवरती**
**फुलराणी ही खेळत होती |** (फुलराणी)

मराठीतील ही नाविण्यपूर्ण कल्पकता प्रत्ययास येते ती या फुलराणीमुळे कधी न अनुभवलेल्या आनंदाची लय जाणवत राहते ती बालकवींच्या कवितेमुळे "बालकवींना मात्र केशवसुतांनी मराठीत आणलेल्या नवीन प्रवाहापैकी निसर्ग कवितेचा प्रवाह हा आपल्या काव्य प्रकृतीला अधिक जवळचा वाटला. त्यांनी तोच जवळ केला आणि आपल्या अनोख्या प्रतिमेचे रंग त्याला देत त्यातून एक वेगळेच रूपसौंदर्य मराठी कवितेला दिले."[१] मराठीच्या काव्य प्रांतात आलेल्या अनेक प्रांतापैकी बालकवींनी निसर्गालाच निवडले आणि निष्ठेने जीवापाड त्याला जपले. म्हणूनच निसर्गाला आपल्या शब्दचमत्कृतीने बालकवींनी सौंदर्यात्मक पध्दतीने प्रतिबिंबीत केले. म्हणूनच निसर्ग कवितेचे ते अग्रदूत ठरतात. बालकवींनी फक्त निसर्गातील मुर्तिमंत सौंदर्यच पाहिले. त्याबरोबरच चैतन्य तत्वाचाही साक्षात्कार त्यांना होतो असे भा.ल. पाटणकर व वा.ल. कुलकर्णी ना वाटत रहायचे. त्यांचा अविष्कार दिव्यत्वाची साक्ष देणारा ठरतो. जीवनवादापेक्षा ही त्यांना आनंद महत्त्वाचा वाटत होता. म्हणून तर निखळ आणि निर्भेळ आनंद देणारं सौंदर्य निसर्गाशिवाय दुसरीकडे असूच शकत नाही. त्यातील दिव्यतेचा त्यांच्या मनावर खोलवर असा परिणाम झाला आहे. यात शंका असण्याचे कारण नाही. अनेक मान्यवरांच्या मते जीवनाची अपूर्णता, दु:खमयता, विरूपता बालकवींच्या मनाला सहन झाल्या नाहीत किंवा निसर्ग सौंदर्याने त्यांना मोहविले अशीच कारणे निसर्ग गीते लिहिण्याची होती असे सांगतात. पण यावरच न थांबता त्यांच्या जीवनाची घडण आणि संस्कार हे ही विचारात घेतले गेले. अनेक प्रसंगानुरूप आधार वाटणार निसर्गासारखा सखा त्यांना भेटला. असेही अनेकांनी विवेचन केले. 'प्रिय सखा फुलांचा, ओढ्यांचा सांगाती' असे तर कुसूमाग्रजच बालकवींविषयी लिहितात. असा हा निसर्गाचा आधार घेत त्यांनी आपला काव्य संसार आनंदमयी केला आणि निसर्गातच त्यांना पूर्णत्व सापडते. मुळात त्यांची वृत्ती आणि दृष्टी ही

तशीच होती म्हणून तर निसर्ग कविता त्यांना मानवली आणि त्यांनी ती फुलवली सुध्दा "बालकवींचे सृष्टीप्रेम निर्हेतुक आणि उत्कट असे. तिजमधील सौंदर्य त्यांना वेड लावी आणि तिच्यामध्ये त्यांना दिव्यत्वाचे व मांगल्याचे दर्शन होई. केशवसुतांपेक्षाही त्यांचे सृष्टीप्रेम उत्स्फूर्त, अकृत्रिम आणि जिव्हाळ्याचे होते. नवीन कवितेमधील सृष्टीचे स्थान त्यांच्या कवितेमुळे अढळ झाले?"[२]

**श्रावणमासी हर्षमानसी हिरवळ दाटे चोहिकडे**
**क्षणात येते सरसर शिरवे, क्षणात फिरूनी ऊन पडे!**
**वरती बघता इंद्रधनुचा गोफ दुहेरी विणलासे**
**मंगल तोरण काय बांधिले नभोमंडपी कुणि भासे !**
**(श्रावण मास)**

निसर्गदृश्यांची इतकी सुंदर शब्दबांधणी बालकवींनी केली. निसर्ग दृश्यानुरूप शब्दांची मांडणी आणि त्यात गुंफलेली लय रसिक वाचकाला सृष्टीकडे आकर्षित केल्याशिवाय रहात नाही. म्हणजेच बालकवींना जी अनुभूती निसर्गाच्या सहचर्याने येते. ती घेण्यास आपणही आपसूक तयार होतो आणि त्याच उद्देशाने सृष्टीकडे पाहत राहतो. हीच त्यांच्या कवितेची महत्ता आहे. म्हणून तर जोग म्हणतात की, कवितेमध्ये सृष्टीला आढळ स्थान बालकवींनीच मिळवून दिले.

**गिरी शिखरे वनमालाही**
**दरी दरी घुमवित येई**
**कड्यावरूनि घेऊन उड्या**
**खेळ लतावलयी फुगड्या**
**घे लोळण खडका वरती**
**फिर गर गर अंगा भोवती. (निर्झरास-१)**

सृष्टीतील झऱ्याचे इतके मनमोहक वर्णन बालकवींशिवाय दुसरा कोणीच नाही करू शकला. कारण त्यांची वृत्ती आणि दृष्टी एकरूप झाली होती ती निसर्गाजवळच. मराठीत या कवितेपासून अनेक 'निर्झर' निर्माण झाले. हीच या कवितेची महती आहे. इथपासूनच बालकवींना 'निसर्गाचा कवी' म्हणून ओळखले जाऊ लागले.

**पर्वत हा , ही दरी दरी**
**तव गीते भरली सारी**
**गाण्याने भरली राने**
**वर खाली गाणे गाणे !**
**(निर्झरास-४)**

निसर्गाच्या सर्व कक्षेत आनंदाचे गाणे भरले आहेत आणि हे गाण्यासाठी निसर्गाशी तादात्म, एकरूप होण्याची जी क्षमता लागते ती बालकवींजवळ होती. यातूनच त्यांनी एकाहून एक निसर्गाचे शब्दशिल्प मराठी कवितेत चित्रीत केले.

पुष्पामध्ये पराग न होय न जे जगाही | सृष्टीत एकही महत्त्व असे न काही || (केशवसुत)

सृष्टी विषयक ही केशवसुतांची दृष्टी मराठी कवितेत पूर्णत्व रूप घेऊन अवतरली ती बालकवींच्या शब्दातून ही दृष्टी आणि हा शब्दाविष्कार या माध्यमातूनच बालकवींच्या कवितांची आजही समीक्षा होतच आहे. त्यायोगे पुन्हा पुन्हा त्यात नाविण्य येत आहे. बालकवींची पूर्णत्वाची श्रध्दा ही निसर्ग हाच होता. प्रेम, आनंद, चैतन्य, सौंदर्य आणि दिव्यत्व यांनी भरलेला निसर्ग बालकवींच्या मनोवस्थेला आकर्षित करत असायचा. अन् ते ही त्यातच बेभान होवून रमायचे. त्याविषयीची जाणीव त्यांच्या एकूण कवितेवरून लक्षात येते. त्यांची मनोवृत्ती अशी निसर्गाशी एकनिष्ठ व्हायची याबाबत ते स्वतः म्हणतात की, 'कवीच झाला सृष्टी, सारी सृष्टी झाली कवी' अशी सुखी जीवनाचे चित्रे बालकवींनी रंगविली. ती प्रथमतःच मराठी कवितेत.

**बाह्य जगातुनि दिव्यरसाचा पूरच हा लोटला**
**हर्षविल, अंतसृष्टि मला..**
**जिकडे तिकडे दिव्य साठले, रत झाले गायत्री,**
**पहा या जनी मनी की वनी. (माझे दिव्य)**

त्यांची अतिशय लाडकी कल्पना दिव्यत्व मांडतानाही ते अत्यंत व्याकुळ होतात. चैतन्य अलौकित्वाची मांडणी ते निसर्ग सानिध्यात करतात आणि दुःखाच्या अनुभवातून सोडवणूक करवून घेतात. "अरूण, फुलराणी, निर्झर, औंदुबर या कवितातील बालकवींची आत्मानुभूती सरळपणाने, भावैक्य मयतेने व्यक्त झाल्याने ती काव्ये मधुर व अधिक परिणामकारक वाटतात.[३]

बालकवींनी आपले नाते हे निसर्गाशी सहज जोडत कविता जपली. या जपण्यातूनच त्यांच्या कवितेला तरलता, संवेदनशीलतेचा एक महत्त्वपूर्ण पेलू लाभला. निसर्गावर असणारी श्रध्दा त्यांना अनेकानेक अनुभूती देत राहते. म्हणूनच ते म्हणतात,

**आनंदी आनंद गडे**
**जिकडे तिकडे चोहीकडे**
**वरती खाली मादे भरे**
**वायूसंगे मोद फिरे......**
**नभांत भरला, दिशात फिरला,**
**जगात उरला, मोद विहरतो चोहीकडे**
**आनंदी आनंद गडे! (आनंदी आनंद)**

सर्वत्र आनंद भरून राहिलेला आहे. आपल्याकडे फक्त ते जाणवणारे संवेदनशील मन असायला हवे त्यासाठी तुमची तादात्म पावण्याची वृत्ती असायला हवी. हेच या आनंदी आनंदचे महत्त्व

आहे. एकूणच निसर्गाचे चैतन्य बालकवी प्रतिपादन करतात. हाच बालकवींचा नव्या कवितेतील आविष्कार मराठी समाजमनाला आवडला. त्याचेच पुढे मराठी कवितेत प्रवाहात रूपांतर झाले. यात अनेक कवी पुढे पुढे, आजपर्यंत प्रतिनिधीत्व करते झाले. याचे सारे श्रेय जाते ते बालकवींना. म्हणूनच रमेश वरखेडे त्यांना 'नव्या सृष्टीचा नव्या यशाचा शिलेदार' असे म्हणतात. अशा निसर्गाच्या अनेक सौंदर्य स्थळांना मराठीत शब्दांच्या माध्यमातून प्रतिबिंबीत करणारे बालकवी एकूणच सृष्टीला अधोरेखित करत राहतात. निसर्गाचा सहवास, सानिध्य हेच त्यांच्या या शब्दपसाऱ्याचे प्रेरणास्थान होते. निसर्गाचे दिव्यत्व जाणने आणि आनंदाची परमोच्च अनुभूती घेणे हाच त्यांच्या कवितेचा ध्यास होय. हीच भावात्मकता आजही त्यांचा वाचक, रसिक, समीक्षक अनुभवतो आहेच.

**संदर्भ सूची:**

१. संपादक, नंदा आपटे, समग्र बालकवी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, २००५, पृष्ठ क्र. १६.

२.रा.श्री. जोग, प्रदक्षिणा, खंड पहिला, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, २००७, पृष्ठ क्र. ११.

३. डॉ. व.दि. कुलकर्णी, काव्य आणि काव्यास्वाद, पद्मगंधा प्रकाशन, पुणे, पृष्ठ क्र. ११.

❑ ❑ ❑

**22**

# काळया आईवरील कविता

डॉ. पैकेकरी एस. पी.
असि. प्रोफेसर,
दादा पाटील महाविद्यालय, कर्जत,
जिल्हा– अहमदनगर

**********

विद्येविना मती गेली। मतीविना नीती गेली।।
नीतिविना गती गेली। गती विना वित्त गेले।।
वित्तविना शूद्र खचले।
इतके अनर्थ एका अविद्येने केले।।

जनसामान्यांना शिक्षणच नव्हते तेव्हा त्यांची अवस्था कषी होती हे महात्मा फुले यांनी आपल्या अखंडातून सांगितले. महात्मा फुले यांनी शेतकऱ्यांचा आसूड व तृतीय रत्न ही पुस्तके लिहून शेतकऱ्यांच्या प्रश्नांना वाचा फोडली. शेतकऱ्यांचाही प्रश्न असतो हे दाखवून दिले. बहुजनांना व स्त्रियांनी पिढयांपिढया शिक्षणापासून वंचित ठेवले होते. त्यांना शिक्षण देऊन त्यांना माणूस म्हणून जगण्याचा हक्क दिला. शिक्षणानंतरच मी कोण? हा प्रश्न उपस्थित झाला व अस्तित्वाची लढाई सुरु झाली. आपला भारत हा खेडयांचा देश आहे व मुख्य व्यवसाय शेती आहे. तरी आमचा शेतकरी पिढयांपिढया दारिद्रयातच जगताना दिसतो. इ.स. १९४७ या वर्षी भारत स्वतंत्र झाला व सन १९५० या वर्षी आपण राज्यघटनेची अमंलबजावणी सुरु केली. घटनेनुसार सर्वांना सर्व अधिकार मिळाले. शिक्षण मिळाले व त्यातून अनेक चळवळी सुरु झाल्या व साहित्य निर्माण होऊ लागले. ग्रामीण साहित्याची सुरवातही १९६० नंतर झाली. सुरवातीने ग्रामीण साहित्य फडके खांडेकर व माडखोलकर यांच्या प्रेरणेने रंजनवादी निर्माण होऊ लागले. पण नंतर १९७० नंतर मात्र अस्सल ग्रामीण साहित्य निर्माण झाले. पहिले ग्रामीण कवी म्हणून ग.ल. ठोकळांचा उल्लेख केला जातो.